## विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१६ मधील नि. ४१ वरील आदेश.

(**CNR–MHAH** २३–०००१७१–२०१६)

१. वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ नुसार वादपत्रात दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे कथनानुसार, दावा प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी दिनांक २४/०६/२०२१ रोजी दावा मिळकतीबाबत दस्त नं. २८३४/२०२१ नुसार ति–हाईत इसमांबरोबर खरेदीखताचा बेकायदेशीर व्यवहार केला आहे. सदर व्यवहार चुकीचा, बेकायदेशीर व रद्दबातल आहे त्यामुळे तो वादी व दावा मिळकतीवर बंधनकारक नाही. त्यामुळे दावा मिळकत खरेदी घेणा–या ति–हाईत इसमांना प्रतिवादी क्र. २ ते ४ म्हणून सामील करणे आवश्यक आहे. तसेच सदर खरेदीखताबाबत आवश्यक तपशील वादपत्रात नमूद करुन सदर खरेदीखताचा व्यवहार वादीवर व दावा मिळकतीवर बंधनकारक नसल्याने त्याबाबत दाद मागण्यासाठी दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे त्रयस्थ इसमांना प्रतिवादी क्र. २ ते ४ म्हणून सामील करुन उपरोक्त खरेदीखताबाबत वादपत्रात मजकूर समाविष्ट करुन तसेच दाव्याचा आकार व विनंती कलम यामध्ये तद्नुषंगीक दुरुस्ती करुन सदर खरेदीखताबाबत जाहिर ठरावाची दाद विनंती कलमात समाविष्ट करण्यासाठी दुरुस्ती करणे आवश्यक आहे असे वादीचे कथन आहे. सबब, प्रस्तुत अर्ज.

२. प्रतिवादी यांनी नि. ४६ येथे अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. सदर प्रतिवादीचे कथनानुसार, दावा मिळकतीशी वादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. वादी हिने दाव्यास कोणतेही कारण घडले नसताना खोटा दावा दाखल केला आहे. प्रतिवादीचे पती आजारी असल्याने त्याच्या वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक अडचण निर्माण झाल्याने प्रतिवादी हिला तिच्या खरेदी मालकीची दावा मिळकत विक्री करण्याशिवाय अन्य पर्याय नसल्याने तिने दावा मिळकत विक्री केली आहे. त्यामुळे वादीच्या हक्काला कोणतीही बाधा आलेली नाही. त्यामुळे दाव्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा, असे प्रतिवादीचे कथन आहे.

३. नियोजित प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी नि. ५० येथे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला. सदर नियोजित प्रतिवादींचे कथनानुसार, दावा मिळकतीशी वादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. वादी हिने दाव्यास कोणतेही कारण घडले नसताना खोटा दावा दाखल केला आहे. प्रतिवादीचे पती आजारी असल्याने त्यांच्या वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक

अडचण निर्माण झाल्याने प्रतिवादी हिला तिच्या खरेदी मालकीची दावा मिळकत विक्री करण्याशिवाय अन्य पर्याय नसल्याने तिने दावा मिळकत विक्री केली आहे. नियोजित प्रतिवादी यांचे खरेदीखताबाबत दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार वादींना नाही. नियोजित प्रतिवादी आवश्यक पक्षकार नाहीत. दाव्याचे चौकशीकामी विलंब होणेसाठी वादीने अर्ज दाखल केला असल्याने तो नामंजूर करण्यात यावा, असे नियोजित प्रतिवादीचे कथन आहे.

४. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन पुढील वादप्रश्न उपस्थित होतात. सदर वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेह पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात विनंती केल्यानुसार वादपत्रात दुरुस्ती होवू मिळण्यास वादी हक्कदार आहेत काय ? | ...होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## का र ण मि मां सा

**वादप्रश्न क्र. १ व २ बाबत –**

६. वादपत्र नि.१ चे अवलोकन करता, प्रस्तुत दावा सन २०१६ मध्ये दाखल आहे. दावा मिळकत गट नं. ३३ बाबत प्रतिवादीने वादीकडुन करुन घेतलेले कथीत खरेदीखत बेकायदेशीर असून ते रद्दबातल आहे असा जाहिर ठराव होणेसाठी वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे. नि. ४४/१ येथील खरेदीखताच्या प्रतीचे अवलोकन करता, प्रतिवादी हिने नियोजित प्रतिवादी क्र. २ ते ४ यांना दिनांक २४/०६/२०२१ रोजी सदर दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत करुन दिले असल्याचे दिसून येते. सदर घटना दावा दाखल झाल्यानंतर घडली आहे. कायदयाचे स्थापित तत्वानुसार दुरुस्त मजकुराच्या गुणदोषाबाबत दुरुस्त अर्जाचा विचार करताना विचार करता येत नाही. त्याबाबत दाव्याचे चौकशीचेवेळी गुणदोषावर निर्णय होणार आहे. नियोजित प्रतिवादी यांना दाव्यात सामील करुन घेतल्यास त्यांना समन्स होवून याकामी त्यांचा बचाव मांडण्याची पुर्ण संधी आहे. तसेच मुळ प्रतिवादी यांना जादा कैफीयत देवून व बचावाचा पुरावा देवून दुरुस्त मजकूराबाबत बचाव मांडण्याची पुर्ण संधी आहे. त्यामुळे सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादमुद्दयाचे एकाचवेळी गुणदोषावर निराकरण होण्याचे दृष्टीने

प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरणार आहे. त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात सदर दुरुस्तीमुळे आमुलाग्र बदल होणार नाही. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास तांत्रीक कारणास्तव नवीन प्रकरण निर्माण होण्याची शक्यता आहे. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत असून वादप्रश्न क्र. २ करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. नि. ४१ येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. नि. ४१ येथील अर्जातील विनंतीनुसार वादीने पुढील तारेखस अगर तत्पुर्वी वादपत्रात दुरुस्ती करुन दुरुस्त वादपत्राची प्रत सादर करावी व त्याची प्रत प्रतिवादींना पुरवावी.

३. दुरुस्त वादपत्राची प्रत अभिलेखावर दाखल झाल्याचे तारखेपासून ३० दिवसांचे आत मुळ प्रतिवादीने दुरुस्त वादपत्राबाबत जादा कैफीयत दाखल करावयाची असल्यास दाखल करावी.

(खुल्या न्यायालयात निवेदित व जाहीर)

GIRISH MADHUKAR SADHALE

Digitally signed by GIRISH MADHUKAR SADHALE
Date: 2022.04.19 13:45:16 +0530

श्रीगोंदा. **( जी. एम. साधले )**

दिनांक १८/०४/२०२२. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

श्रीगोंदा, जि. अहमदनगर.